11 DEC 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्याशाखीय संशोधनाला महत्त्व

## डॉ. राकेश कुमार शर्मा : भौतिकशास्त्राच्या आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : आधुनिक कालखंडात आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे महत्त्व आले आहे. त्या दिशेने नवसंशोधकांनी संशोधनाची दिशा केंद्रित करावी, असे आवाहन येथील डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठात 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन' या विषयावरील पाचव्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, तर ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. दीपक डुबल प्रमुख उपस्थित होते.

नॅनो-मटेरियल, फायबर ऑप्टीक्स इत्यादी सूक्ष्मातिसूक्ष्म तंत्रज्ञानने आज संपूर्ण संशोधन क्षेत्राला वेगळी दिशा प्रदान केली आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या शक्यताही मोठ्या प्रमाणात वाढविल्या आहेत. त्यामुळे विविध विद्याशाखांमध्ये ज्ञानाची, संशोधनाची देवाणघेवाण होणे आवश्यक असल्याचे मत डॉ. शर्मा यांनी व्यक्त केले. विविध शास्त्रशाखांना एकमेकांपासून वेगळे न मानता आता त्या सर्वांच्या एकत्रीकरणातून उदयास येत असलेल्या नवनव्या ज्ञानशाखांमध्ये संशोधन करण्यास विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले. ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. एस. एच. पवार, सी. डी. लोखंडे, मानसिंग टाकळे, केशव राजपुरे आदी उपस्थित होते.

डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांनी परिचय करून दिला. भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले.






**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्रावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. राजीव व्हटकर, आण्णासाहेब मोहोळकर, दीपक डुबल, ज्योती जाधव, राजेंद्र सोनकवडे, नीलेश तरवाळ, व्ही. एस. कुंभार आदी.

### विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान

**जगभरामध्ये मला ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाचा संशोधक, प्राध्यापक म्हणून ओळखतात. तथापि, मी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी आहे, हीच ओळख मला अधिक भावते. मला संशोधक म्हणून घडविणारे शिक्षक येथे भेटले. त्यामुळे जगाच्या पाठीवर मानसन्मान, पुरस्कार मिळाले, तरी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी हीच ओळख मिरविण्यात मला अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांनी स्वतःतील क्षमता ओळखून जगभरातील शैक्षणिक, संशोधकीय संधींचा शोध घ्यावा. विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन डॉ. डुबल यांनी केले.**

1 1 DEC 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# आंतरविद्याशाखीय संशोधनावर लक्ष केंद्रित करावे

## शर्मा : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आधुनिक कालखंडात आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दिशेने नवसंशोधकांनी आपल्या संशोधनाची दिशा केंद्रित करावी, असे आवाहन येथील डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरु डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात बुधवारपासून 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स ॲण्ड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन' या विषयावरील पाचव्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. दीपक



डुबल हे या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले की, मूलभूत पदार्थविज्ञानाने जवळपास सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील बहुतांश उपकरणे ही भौतिकशास्त्रज्ञांनीच संशोधित आणि निर्मित केली आहेत. नॅनो-मटेरियल, फायबर ऑप्टिक्स इत्यादी सूक्ष्मातिसूक्ष्म तंत्रज्ञानाने संपूर्ण संशोधन क्षेत्राला वेगळी दिशा प्रदान केली आहे.

डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, आजचा काळ आंतरविद्याशाखीय संशोधनाचा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानदृष्टीच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत. जीवशास्त्रामधील जवळपास सर्वच जैविक घडामोडींना पदार्थविज्ञानातील सिद्धांतांचा आधार असल्याचे दिसते. डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. अण्णासाहेब मोहोळकर यांनी परिचय करून दिला. भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. नीलेश तरवाळ यांनी परिषदेच्या भूमिका स्पष्ट केली. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. परिषदेला ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. एस. एच. पवार, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. केशव राजपुरे यांच्यासह देशाच्या विविध विद्यापीठांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025 जनप्रवास



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. राकेश कुमार शर्मा. सोबत डॉ. राजीव व्हटकर, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. दीपक डुबल, डॉ. ज्योती जाधव आदी.

# आंतरविद्याशाखीय संशोधनावर लक्ष केंद्रित करा

## ● डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांचे आवाहन

जनप्रवास : कोल्हापूर

आधुनिक कालखंडात आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दिशेने नवसंशोधकांनी आपल्या संशोधनाची दिशा केंद्रित करावी, असे आवाहन डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन'या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. डॉ. दीपक डुबल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

कुलगुरू शर्मा म्हणाले, नॅनो-मटेरियल, फायबर ऑप्टीक्स इत्यादी तंत्रज्ञानाने संशोधन क्षेत्राला वेगळी दिशा दिली आहे. आंतरविद्याशाखीय विद्याशाखांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण झाली पाहिजे. डॉ. डुबल म्हणाले, मला संशोधक म्हणून घडविणारे शिक्षक शिवाजी विद्यापीठात भेटले. त्यामुळे जगाच्या पाठीवर कितीही मानसन्मान मिळाले, तरी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी हीच ओळख मिरविण्यात मला अभिमान वाटतो.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानदृष्टीच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत. नवनव्या ज्ञानशाखांमध्ये संशोधन करण्यास विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे.

डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांनी परिचय करून दिला. डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. एस. एच. पवार, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. केशव राजपुरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025
महा न्यूज अँड व्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# आंतरविद्याशाखीय संशोधनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक : डॉ. राकेश कुमार शर्मा

## शिवाजी विद्यापीठात तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ) :**

आधुनिक कालखंडात आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दिशेने नवसंशोधकांनी आपल्या संशोधनाची दिशा केंद्रित करावी, असे आवाहन येथील डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन' या विषयावरील पाचव्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. दीपक डुबल हे या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, मूलभूत पदार्थविज्ञानाने जवळपास सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील बहुतांश उपकरणे ही भौतिकशास्त्रज्ञांनीच संशोधित आणि निर्मित केली आहेत. नॅनो-मटेरियल, फायबर ऑप्टीक्स इत्यादी सूक्ष्मातिसूक्ष्म तंत्रज्ञानाने आज संपूर्ण संशोधन क्षेत्राला वेगळी दिशा प्रदान केली आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या शक्यताही मोठ्या प्रमाणात वाढविल्या आहेत. त्यामुळे विविध विद्याशाखांमध्ये ज्ञानाची, संशोधनाची देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन संस्थांसमवेत सहकार्यवृद्धी करणेही अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने आज सर्वच स्तरांवर प्रयत्नांची आवश्यकता आहे.



**'विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान'**

यावेळी डॉ. दीपक डुबल यांनी शिवाजी विद्यापीठातील आपल्या विद्यार्थीदशेतील आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, जगभरामध्ये मला ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाचा संशोधक, प्राध्यापक म्हणून ओळखतात. तथापि, मी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी आहे, हीच ओळख मला अधिक भावते. कारण माझ्या व्यक्तीमत्त्वाला प्राथमिक पैलू येथे पडले; मला संशोधक म्हणून घडविणारे शिक्षक येथे भेटले. त्यामुळे जगाच्या पाठीवर कितीही मानसन्मान, पुरस्कार मिळाले, तरी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी हीच ओळख मिरविण्यात मला अभिमान वाटतो. इथल्या विद्यार्थ्यांनी स्वतःतील क्षमता ओळखून जगभरातील शैक्षणिक, संशोधकीय संधींचा शोध घेतला पाहिजे आणि विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरविण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, आजचा काळ आंतरविद्याशाखीय संशोधनाचा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानदृष्टीच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत. जीवशास्त्रामधील जवळपास सर्वच जैविक घडामोडींना पदार्थविज्ञानातील सिद्धांतांचा आधार असल्याचे दिसते. उष्मगतिकीशास्त्र (थर्मोडायनॅमिक्स), विद्युतचुंबकीय शास्त्र (इलेक्ट्रोमॅग्नेटिझम), प्रकाशशास्त्र (ऑप्टीक्स) ही सर्वच भौतिकीय शास्त्रे अनुक्रमे मानवी शरीरामधील तापमान नियंत्रण प्रणाली, हृदय गती, डोळ्यांचे कार्य इत्यादींशी निगडित आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येऊ शकतील. त्यामुळे या विविध शास्त्रशाखांना एकमेकांपासून वेगळे न मानता आता त्या सर्वांच्या एकत्रीकरणातून उदयास येत असलेल्या नवनव्या ज्ञानशाखांमध्ये संशोधन करण्यास विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच डॉ. शर्मा यांच्या हस्ते परिषदेच्या ई-स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले. डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांनी परिचय करून दिला. भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. व्ही.एस. कुंभार यांनी आभार मानले. परिषदेला ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. एस.एच. पवार, डॉ. सी.डी. लोखंडे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. केशव राजपुरे यांच्यासह देशाच्या विविध विद्यापीठांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025
पुण्यनगरी

# संशोधनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक : डॉ. शर्मा

## विद्यापीठात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

आधुनिक कालखंडात आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दिशेने नवसंशोधकांनी आपल्या संशोधनाची दिशा केंद्रित करावी, असे आवाहन येथील डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात बुधवारपासून 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' या विषयावरील पाचव्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. दीपक डुबल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, मुलभूत पदार्थ विज्ञानाने जवळपास सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील बहुतांश उपकरणे ही भौतिकशास्त्रज्ञांनीच संशोधित आणि निर्मित केली आहेत. नॅनो-मटेरियल, फायबर ऑप्टिक्स इत्यादी सूक्ष्मातिसूक्ष्म तंत्रज्ञानाने आज संपूर्ण संशोधन क्षेत्राला वेगळी दिशा प्रदान केली आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या शक्यताही मोठ्या प्रमाणात वाढवल्या आहेत. त्यामुळे विविध विद्याशाखांमध्ये ज्ञानाची, संशोधनाची देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन संस्थांसमवेत सहकार्यवृद्धी करणेही अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने आज सर्वच स्तरांवर प्रयत्नांची आवश्यकता आहे.

यावेळी डॉ. दीपक डुबल यांनी शिवाजी विद्यापीठातील आपल्या विद्यार्थिदशेतील आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, जगभरामध्ये मला ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाचा संशोधक, प्राध्यापक म्हणून ओळखतात. तथापि, मी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी आहे, हीच ओळख मला अधिक भावते. इथल्या विद्यार्थ्यांनी स्वतःतील क्षमता ओळखून जगभरातील शैक्षणिक, संशोधकीय संधींचा शोध घेतला पाहिजे आणि विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर पसरवण्यासाठी सिद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, आजचा काळ आंतरविद्याशाखीय संशोधनाचा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानदृष्टीच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत. उष्मगतिकीशास्त्र (थर्मोडायनॅमिक्स), विद्युतचुंबकीयशास्त्र (इलेक्ट्रोमॅग्नेटिझम), प्रकाशशास्त्र (ऑप्टिक्स) ही सर्वच भौतिकीय शास्त्रे अनुक्रमे मानवी शरीरामधील तापमान नियंत्रण प्रणाली, हृदय गती, डोळ्यांचे कार्य इत्यादींशी निगडित आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येऊ शकतील. त्यामुळे या विविध शास्त्रशाखांना एकमेकांपासून वेगळे न मानता आता त्या सर्वांच्या एकत्रीकरणातून उदयास येत असलेल्या नवनव्या ज्ञानशाखांमध्ये संशोधन करण्यास विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन करण्यात आले, तसेच डॉ. शर्मा यांच्या हस्ते परिषदेच्या ई-स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले. डॉ. राजीव व्हटकर यांनी स्वागत केले. डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांनी परिचय करून दिला. भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलेश तरवाळ यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. परिषदेला ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. एस. एच. पवार, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. केशव राजपुरे यांच्यासह देशाच्या विविध विद्यापीठांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025 तरुण भारत

# राष्ट्राच्या समृद्धीचा मार्ग संविधानातच

## जिल्हाधिकारी येडगे : विद्यापीठात 'राज्यघटना संरचना सिद्धांतांचा विकास' कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

व्यक्ती, समाज आणि देशाच्या सर्वांगीण समृद्धीचा मार्ग भारतीय संविधानातूनच जातो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यास केंद्र आणि समाज कल्याण विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा योजनेअंतर्गत आयोजित 'भारतीय राज्यघटनाः मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास" या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी तथा ज्येष्ठ



**कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे सोबत डॉ. प्रकाश पवार, सचिन साळे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. कृष्णा पाटील.**

साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सचिन साळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात जात, धर्म, वंश, पंथ यातील भिन्नता असूनही एकात्मता जपण्याचे कार्य भारतीय संविधान करते, असे सक्षम, सर्वसमावेशक आणि मूल्यआधारित संविधान जगात दुर्मिळ आहे. म्हणून संविधानाचा अभ्यास आणि पालन सर्वांनी केले पाहिजे.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, नागरिक म्हणून आपण हक्कांची मागणी करत असताना कर्तव्यांची जाणीवही अंगी बाणवली पाहिजे. भारतीय राज्यघटना हा एक जिवंत दस्तऐवज आहे. तिच्या मूलभूत तत्त्वांमध्येच राष्ट्रजीवनाला स्थैर्य, दिशा आणि मूल्याधिष्ठान मिळते.

यानंतरच्या सत्रात लक्ष्मीकांत देशमुख यांनी संविधानाच्या मूलभूत संरचनेच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले.

गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नगिना माळी आणि प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एच. पाटील, डॉ. श्रीराम पवार, उपकुलसचिव डॉ. निलेश बनसोडे, विलास सोयम, डॉ सकट, विनय शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या समृद्धीचा मार्ग संविधानातच : जिल्हाधिकारी अमोल येडगे

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ) :**

व्यक्ती, समाज आणि देशाच्या सर्वांगीण समृद्धीचा मार्ग भारतीय संविधानातूनच जातो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यास केंद्र आणि समाज कल्याण विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा योजनेअंतर्गत आयोजित ''भारतीय राज्यघटना: मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास'' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूरचे माजी जिल्हाधिकारी तथा ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सचिन साळे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात जात, धर्म, वंश, पंथ यांतील भिन्नता असूनही एकात्मता जपण्याचे कार्य भारतीय संविधान करते. असे सक्षम, सर्वसमावेशक आणि मूल्यआधारित संविधान जगात दुर्मिळ आहे. सरनाम्यातील प्रत्येक शब्द हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी जोडलेला आहे. म्हणून संविधानाचा अभ्यास आणि पालन सर्वांनी केले पाहिजे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आधार देतात. लोकशाही बळकट होण्यासाठी जागृत नागरिक होणे गरजेचे आहे. 'हर घर संविधान' या उपक्रमाला सर्वांनी हातभार लावावा. शाळा स्तरावर संविधानातील कलमे व सरनाम्याचा अर्थ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, नागरिक म्हणून आपण हक्कांची मागणी करत असताना कर्तव्यांची जाणीवही अंगी बाणवली पाहिजे. भारतीय राज्यघटना हा एक जिवंत दस्तऐवज आहे. तिच्या मूलभूत तत्त्वांमध्येच राष्ट्रजीवनाला स्थैर्य, दिशा आणि मूल्याधिष्ठान मिळते.

यानंतरच्या सत्रात लक्ष्मीकांत देशमुख यांनी संविधानाच्या मूलभूत संरचनेच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नगिना माळी आणि प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एच. पाटील, डॉ. श्रीराम पवार, उपकुलसचिव डॉ. निलेश बनसोडे, विलास सोयम, डॉ उत्तम सकट, विनय शिंदे यांच्यासह विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11 DEC 2025
लोकमत

# स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी ताराबाईंचा लढा

## जयसिंगराव पवार यांचे मत : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार, अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा साक्षेपी अभ्यास करावा, असे आवाहन ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

महाराणी ताराबाई यांच्या ३५०व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राला प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र तर्फे चर्चासत्र आयोजित केले आहे.

डॉ. पवार म्हणाले, गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी अभ्यास झाला, त्यामध्ये महाराणी ताराबाईंची खूपच उपेक्षा झाली. या कालखंडात शिवचरित्रे, पेशव्यांचे चरित्र लिहिले; मात्र ताराबाईंविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. डॉ. देशमुख म्हणाले, ताराबाई यांनी एकाचवेळी मोगलांसारखा शत्रू, स्वकीय, पेशवे असा त्रिस्तरीय संघर्ष केला. त्याविषयी अधिक चिकित्सक अंगाने मांडणी व्हावी. डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. विजय चोरमारे, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, डॉ. अवनीश पाटील, प्रांजली क्षीरसागर, डॉ. नीलांबरी जगताप उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2025
महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609


# स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी ताराबाईंचा लढा : डॉ. जयसिंगराव पवार

## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय चर्चासत्राला प्रारंभ

कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ) :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार आणि अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा साक्षेपी अभ्यास करावा, असे आवाहन ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात आजपासून ''महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक: एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप'' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राला प्रारंभ झाला. त्यावेळी उद्घाटन सत्रात चर्चासत्राचे सूत्रभाष्य करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत आहे.आपल्या विवेचनात ताराबाई यांच्याविषयी इतिहासकारांनी लेखनउपेक्षा बाळगली, याची खंत व्यक्त करताना डॉ. पवार म्हणाले, महाराणी ताराबाई या कर्तबगार आणि पराक्रमी होत्या. तरीही गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी जो अभ्यास झाला, त्यामध्ये त्यांची खूपच उपेक्षा झाली. या कालखंडात अनेकांनी शिवचरित्रे लिहिली, पेशव्यांचे चरित्र लिहिले, तथापि, ताराबाईंविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. किंबहुना, छत्रपती शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या उदयापर्यंतचा कालखंड याबाबतीत उपेक्षित राहिला. इतिहासकारांनी संभाजी महाराजांना बदफैली आणि राजाराम महाराजांना दुबळा ठरविले आणि थेट बाळाजी विश्वनाथाच्या चरित्राला हात घातला. गुरूवर्य वा.सी. बेंद्रे यांनी मात्र छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी सुमारे ४० वर्षे संशोधन करून त्यांची उज्ज्वल प्रतिमा जगासमोर आणली. छत्रपती राजाराम महाराज आणि छत्रपती ताराबाई यांच्याविषयीचे संशोधन माझ्या हातून व्हावे, हा नियतीसंकेत असावा, असे ते म्हणाले.




डॉ. पवार पुढे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू तथा ज्येष्ठ इतिहासकार डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ताराबाईविषयीची कागदपत्रे वेगवेगळ्या देशीविदेशी दप्तरांमधून अथक परिश्रमाने आयुष्यभर जमा केली. या कागदपत्रांचे विश्लेषण, अभ्यास आणि संशोधन करण्याची संधी त्यांनी दिली. त्यामधून ताराबाईंचा वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर आणता आला आणि उपेक्षेच्या छायेतून त्यांना बाहेर काढता आले. नव्या संशोधकांनी अद्यापही अज्ञात असणारे त्यांचे पैलू सामोरे आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.अध्यक्षीय मनोगतात अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, या दोनदिवसीय चर्चासत्रात भारतातील मराठेशाहीच्या जडणघडणीविषयी साद्यंत चर्चा व्हावी. विशेषतः महाराणी ताराबाई यांनी एकाच वेळी मोगलांसारखा शत्रू, स्वकीय आणि पेशवे असा त्रिस्तरीय संघर्ष केला. त्याविषयी अधिक चिकित्सक अंगाने मांडणी व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते महाराणी ताराबाई यांच्या प्रतिमेस डॉ. पवार यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.कार्यक्रमास डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. विजय चोरमारे, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट यांच्यासह इतिहासाचे शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.'ताराबाई हिम्मतबाज, बुद्धिमान आणि शहाण्या रणनीतीज्ञ'यावेळी मराठी अधिविभागाच्या डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांची महाराणी ताराबाई यांच्याविषयी घेतलेली मुलाखत तासाभराहून अधिक काळ रंगली. डॉ. पवार यांनी यावेळी ताराबाईंच्या अनेक ज्ञात-अज्ञात पैलूंची अत्यंत वेधक माहिती दिली. ते म्हणाले, ताराबाई या अत्यंत हिम्मतबाज, बुद्धिमान आणि शहाण्या रणनीतीज्ञ होत्या. सैन्याचे संयोजन त्या अत्यंत कुशल पद्धतीने करीत असत, असे गौरवोद्गार परदेशी इतिहासकारांनी केले आहे. फिलीप सार्जंट याने तर जगातील आघाडीच्या दहा प्रभावी महिलांमध्ये त्यांची गणना केली आहे. ताराबाईंनी एक प्रकारे मोगलांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्धच छेडले होते. मराठा स्वराज्याचा विस्तार मोठ्या कौशल्याने करून त्यांनी त्याचे साम्राज्यात रूपांतर केले. नवा मुलूख काबीज करणे, किल्ले लढवत ठेवणे आणि संधी मिळताच बादशहाला नामोहरम करणे अशी यशस्वी नीती त्यांनी अवलंबली होती. मराठे पराक्रमी होते, मात्र छत्रपतींना विसरले होते. म्हणून अटकेपार झेंडे रोवूनही पानिपतापर्यंत घसरले, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल सांगितले. रामराजा प्रकरणही त्यांनी उपस्थितांना अत्यंत मुद्देसूद पद्धतीने सांगितले आणि या प्रकरणातही ताराबाई यांची भूमिका योग्यच होती, हे ऐतिहासिक दाखल्यांचा संदर्भ देऊन सांगितले.

11 DEC 2025

पुण्यनगरी

# आयात-निर्यातसंबंधी शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाबरोबरच उद्योजकता वृद्धीसाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणारे शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, लेव्हलअप ॲकॅडमी, कोल्हापूर आणि डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, तळसंदे (कोल्हापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकल टू ग्लोबल ऑपॉर्च्युनिटीज : एक्स्पोर्ट-इम्पोर्ट' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या सभागृहात झाली. कार्यशाळेला युवकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक अक्षय राणे यांनी भारतीय युवकांसाठी आयात-निर्यात क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत व जागतिक व्यापारातील वाढत्या शक्यता, उद्योगातील आवश्यक कौशल्ये, व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया, परकीय बाजारपेठेतील मागणी यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या



आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. रामचंद्र पवार यांनी कौशल्याधिष्ठित शिक्षणाबरोबरच जागतिक पातळीवरील संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी चौफेर ज्ञान घेऊन सुसज्ज व्हायला हवे, असे सांगितले.

उपप्राचार्य प्रा. पी. डी. उके, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. योगेश शेटे, लेव्हलअप ॲकॅडमीचे संचालक सिद्धार्थ पंडित आणि संचालिका सलोनी पंडित यांनीही विद्यार्थ्यांना रोजगार व उद्योजकतेच्या संधींबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना एक्स्पोर्ट-इम्पोर्ट क्षेत्रातील नव्या दिशा, कौशल्य विकासाच्या संधी आणि जागतिक व्यापारातील करिअर मार्गांविषयी अद्ययावत माहिती प्राप्त होण्यास मदत झाली.

1 1 DEC 2025
लोकसत्ता

# भाऊ पाध्ये यांच्या साहित्यावर कोल्हापुरात उद्यापासून चर्चासत्र

**कोल्हापूर :** लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे शुक्रवारपासून 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्‌मयः आकलन आणि पुनर्विचार' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात चर्चासत्र होणार असल्याची माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

कवी, समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या शुक्रवारी हस्ते उद्‌घाटन, ज्येष्ठ लेखक-समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांचे बीजभाषण होईल. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी असतील. आरती साळुंखे, गोरख थोरात यांनी अनुवादित केलेल्या भाऊ पाध्ये यांच्या 'राडा' या कादंबरीच्या हिंदी भाषांतराचे प्रकाशन होईल. कथावाङ्‌मय, कादंबरी वाङ्‌मय या विषयांवरील चर्चेत आसाराम लोमटे, अवधूत डोंगरे, शीतल पावसकर, नितीन रिंढे, दत्ता घोलप, डॉ. माया पंडित-नारकर सहभागी होतील. शनिवारी भाऊ पाध्ये यांच्या निवडक वाङ्‌मयाचे ओंकार थोरात अभिवाचन करतील. 'भाऊ पाध्येः स्तंभलेखन, चित्रपटविषयक आणि अन्य लेखन' या विषयावरील परिसंवाद डॉ. श्रीराम पवार, डॉ. महादेव देशमुख, प्रसाद कुमठेकर, गोरख थोरात, सचिन परब सहभागी होतील.

11 DEC 2025
लोकमत

# सृष्टी भोसलेने पटकाविले 'कांस्य'

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये ६५ किलो वजनगटात फ्री-स्टाइल या कुस्ती प्रकारात सृष्टी जयवंत भोसले हिने कांस्यपदक पटकाविले. सृष्टी ही कोल्हापुरातील कदमवाडी येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजची विद्यार्थिनी आहे.

राजस्थान येथील लोहागर स्टेडियम येथे या कुस्ती स्पर्धा झाल्या. तिला शिवाजी विद्यापीठ संघाचे संघ व्यवस्थापक डॉ. विक्रमसिंह नांगरे यांचे मार्गदर्शन लाभले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील, समिती अध्यक्ष संगीता पाटील, प्रशांत पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले आदींचे प्रोत्साहन लाभले.